सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरसीएच, एनआरएचएम या कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारची औषधे, छपाई, साधनसामुग्रीची खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०३१८/प्र.क्र.१२३/आ -७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २१ मार्च, २०१८.

वाचा :-

अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण, पुणे यांचे क्र. राआसो/ नर्सिंग/१८, दिनांक २० जानेवारी, २०१८.

प्रस्तावना :-

केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमाच्या सन २०१६-१७ च्या पीआयपीला मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर पीआयपी अंतर्गत (FMR Code B.१०.७.१) आरसीएच, एनआरएचएम या कार्यक्रमांतर्गत असणाऱ्या विविध बाबी करीता लेखाशिर्ष निहाय विविध प्रकारची औषधे, छपाई, साधनसामुग्रीच्या खरेदी करावयाची आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व कार्यक्रमात येणारे लाभार्थी तसेच जिल्हा/मनपा निहाय प्राप्त झालेली मागणी आणि केंद्र शासनामार्फत प्राप्त विनिर्देश राज्य स्तरावर तयार करण्यात आलेली EDL व राज्यस्तरीय तांत्रिक विनिर्देश समिती मार्फत तयार करण्यात आलेले तांत्रिक विनिर्देश Technical Specification विचारात घेवून सदर औषधे, छपाई व साधन सामुग्रीच्या खरेदी स प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान (पीआयपी) (FMR Code B.१०.७.१) अंतर्गत आरसीएच, एनआरएचएम या कार्यक्रमांतर्गत असणाऱ्या विविध बाबी करीता खालील

विवरणपत्रामध्ये नमूद लेखाशिर्ष निहाय विविध प्रकारची औषधे, छपाई, साधनसामुग्रीच्या खरेदी करण्यासाठी एकूण रक्कम रु.२८७.६९ लक्ष (रुपये दोन कोटी सत्त्याऐंशी लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) इतका निधी खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर बाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

Sr. No.	FMR Code	Budjet Head	Approval PIP	Procurement Proposal amount
1	B.10.7.1	Printing of MCP Cards,safe mother hood booklets etc.	15.03	15.03
2	B.10.7.2	Printing of WIFS Cards etc.	94.71	94.71
3	B.10.7.4.2	AFHC Cards	1.57	1.57
4	B.15.3.2.1.4.3	Procurement of ANMOL Tablets	54	54
5	B.16.1.6.2	PE Kit	1.68	1.68
6	B.16.2.1.3.1	Safe Delivery kits	16.66	16.66
	A.1.6.2	Diagnostic JSSK(Glucose powder)	104.04	104.04
Total			287.69	287.69

३. सदरची प्रशासकीय मान्यता पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर औषधे व प्रयोगशाळा साहित्य यांची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू औषधे व प्रयोगशाळा साहित्य यांचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) परिच्छेद क्र. २ मधील विवरणपत्रामध्ये नमूद साधनसामग्री / औषधंची प्रस्तावित खरेदी ही राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम अंमलबजावणी आराखडा (PIP) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून खर्च करण्यात यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१२) प्रस्तुत प्रकरणी किती निधीची खरेदी करण्यात आली व संबंधीत एपकरणे कोणत्या जिल्ह्यांना व किती पुरवठा करण्यात आला, याची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

४. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

५.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११६१६४६९९१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.04.04 15:45:36 +05'30'

(अ. नि. साखरकर)

अवर सचिव

प्रति,

अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)